ePaper
मुख्यमंत्री शिंदे सर्व आमदारांसह अयोध्या दौऱ्यावर जाणार!



| वर्ष - 6 । अंक - 333 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज ™
लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

**आतील पानांत**

- पुण्यातील महिला स्वच्छतागृहे गैरसोयीची!
- पीएमपी चालक असुरक्षित?
- चांगल्या समाजासाठी वृत्तपत्रांची गरज आहे

www.mahaenews.com । गुरुवार, दि. 23 मार्च 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# आयुक्तांची दबंगगिरी!

## » कचरा विलगीकरणाची सक्ती : 1 एप्रिलपासून कारवाई करणार

। पिंपरी। महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड शहरात ओला, सुका आणि घरगुती घातक कचऱ्याचे विलगीकरण एक एप्रिलपासून सक्तीचे केले जाणार आहे. अन्यथा महापालिकेकडून कचरा संकलन केले जाणार नाही. शिवाय, संबंधितांवर दंडात्मक कारवाईही केली जाणार आहे. तसेच, कचरा विलगीकरणापोटी शुल्क आकारले जाणार आहे, अशी आक्रमक भूमिका महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी घेतली आहे.**







वास्तविक, प्रशासनाने यापूर्वीच या निर्णयाची अंमलबजावणी करण्याची तयारी केली होती. मात्र, सोसायटीधारक आणि लोकप्रतिनिधींचा विरोध वाढला. तसेच, पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी पुढील नियोजनापर्यंत 'जैसे थे'ची सूचना केली होती. मात्र, येत्या १ एप्रिलपासून नियमांची कडक अंमलबजावणी करण्याची भूमिका प्रशासनाने घेतली आहे. त्यामुळे नवा वाद सुरू होण्याची शक्यता आहे.

केंद्र सरकारच्या २०१६ च्या मार्गदर्शक सूचनांनुसार मोठ्या प्रमाणात कचरा निर्मिती करणाऱ्या संस्थांनी त्यांच्या स्तरावरच प्रक्रिया करणे बंधनकारक आहे. या सोसायट्यांना मालमत्ता करातील सामान्य करामध्ये पाच टक्के तर झिरो वेस्टसाठी आठ टक्के सवलत दिली जाणार आहे. महापालिका सर्वसाधारण सभेने २० ऑक्टोबर २०२१ रोजी कचरा विलगीकरण शुल्काच्या प्रस्तावास मान्यता दिली आहे. त्याची अंमलबजावणी करण्याबाबत सिंह यांनी यापूर्वीच सूचना जारी केली आहे. त्या पार्श्वभूमीवर महापालिका आणि पिंपरी-चिंचवड स्मार्ट सिटी यांच्यातर्फे आयोजित 'संवाद आयुक्तांशी' या ऑनलाइन कार्यक्रमात सिंह यांनी कचरा विलगीकरणावर ठामपणे भूमिका मांडली. ओला व सुका कचऱ्यावर प्रक्रिया केली जात आहे.

### असे असेल शुल्क

- » घरगुती कचऱ्यापोटी दरमहा ६० व वार्षिक ७२० रुपये द्यावे लागणार
- » व्यावसायिकांना दरमहा ९० ते २४० रुपयांपर्यंत शुल्क द्यावे लागेल
- » कचरा सेवाशुल्क मिळकतकराच्या बिलात दर्शविले जाणार
- » मंगल कार्यालये, मॉल्स, चित्रपटगृहे यांना दोन हजार रुपये शुल्क

> शहरात ओला, सुका, घातक असे कचऱ्याचे विलगीकरण न झाल्यास दंड आकारणार येईल. विलगीकरण न केलेला कचरा एक एप्रिलपासून उचलला जाणार नाही. कचरा विलगीकरण चांगले झाले, तर, पुढील नियोजन चांगले राहते. त्यामुळे नागरिकांनी ओला, सुका कचऱ्याचे विलगीकरण करावे. सद्यःस्थितीत ९० टक्के कचरा विलगीकरण होत आहे.
> - शेखर सिंह, आयुक्त, महापालिका.

# तळवडेत 'डीअर पार्क' ऐवजी 'बायोडायव्हर्सिटी पार्क' उभारणार!

## » महापालिका स्थायी समितीचा निर्णय : 'डीअर पार्क'ला वनविभागाचा नकार

। पिंपरी। महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवडमधील इंद्रायणी नदीच्या परिसरातील तळवडे गायरानात डीअर सफारी पार्क उभारण्याचा प्रस्ताव पंधरा वर्षांपासून आहे. त्याला अद्याप मुहूर्त लागलेला नाही. मात्र, त्या आरक्षणात आता बदल करून, डीअर पार्क ऐवजी बायोडायव्हर्सिटी पार्क उभारण्यात येणार आहे. त्यासाठी आरक्षण करण्याबाबतचा निर्णय महापालिका स्थायी समिती सभेने घेतला.**



महापालिका भवनात प्रशासक तथा आयुक्त शेखर सिंह यांच्या अध्यक्षतेखाली स्थायी समितीची सभा झाली. त्यात आरक्षणाच्या नावात बदल करण्याचा निर्णय घेण्यात आला. डीअर पार्क करण्याबाबतचा अभिप्राय वनविभागाला महापालिकेने मागितला होता. त्यांचा नकारात्मक अभिप्राय आल्याने महापालिका अधिकाऱ्यांनी सदर जागेची पाहणी केली व आरक्षणच्या नावात बदल करण्याचा निर्णय घेण्यात आला. बायोडायव्हर्सिटीबाबतचे निर्णय घेण्याचे अधिकारी प्रशासकांना देण्यात आले आहेत. तळवडेतील आरक्षणात डीअर पार्क (हरिण पार्क) उभारण्यास वनविभागाने नकार दर्शविला आहे.

### प्रअन्य मंजूर विषय पुढीलप्रमाणे

- » महापालिका शाळेतील शिक्षकांच्या जबाबदारी निश्चित करणे
- » कृष्णानगर येथील क्रीडांगण विकसित करून चालविण्यास देणे
- » हिंजवडी शिवाजी चौक ते विठ्ठल मंदिर रस्ता मजबूत करणे
- » माझी वसुंधरा अभियानांतर्गत विविध उपक्रम राबविणे
- » विविध ठिकाणी ईव्ही चार्जिंग स्टेशन उभारून चालविण्यास देणे
- » अतिरिक्त आयुक्त, शहर अभियंता पदांच्या निकषात बदल
- » झोपडपट्टी पुनर्वसन लिंकरोड प्रकल्पातील विविध कामे करणे
- » सांगवी फाटा भुयारी मार्गाजवळील मुळा नदीवर पूल बांधणे

# पुण्यातील महिला स्वच्छतागृहे गैरसोयीची!

## तुटक्या बादल्या, गळक्या नळांसह स्वच्छतागृह कुलूपबंद

। पुणे। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**शहरातील मुख्य बाजारपेठांमध्ये महिलांची सर्वाधिक वर्दळ असते. मात्र, या बाजारपेठांच्या परिसरात महिलांसाठीच्या स्वच्छ स्वच्छतागृहांचा अभाव असल्याचे चित्र आहे. स्वच्छतागृहांच्या मर्यादित संख्येबरोबरच तेथील अस्वच्छता आणि असुरक्षितता पाहता 'स्वच्छतागृहांचा वापर टाळलेलाच बरा' अशीच भावना बहुसंख्य महिलावर्गाच्या मनात निर्माण होते. यामुळे गैरसोयीसह आरोग्याच्या समस्यांना आमंत्रण देण्यासारखी परिस्थिती असल्याने महिला अशा ठिकाणी स्वच्छतागृहांमध्ये जाण्याचे टाळतात. या स्वच्छतागृहांमध्ये तातडीने सुधारणा होण्याची गरज असून, पाणी, वीज, स्वच्छता, कचरापेटी अशा किमान सुविधा सर्व ठिकाणी उपलब्ध व्हायला हव्यात.**

तुळशीबाग, मंडई, लक्ष्मी रस्ता या मध्यवर्ती पेठांच्या भागांतील बाजारपेठा, शाळा-महाविद्यालये असल्याने तेथे महिलांची अधिक वर्दळ असते. केवळ बाजारपेठांत येणाऱ्या महिला ग्राहकच नाही, तर विक्रेत्या, दुकानांतील कर्मचाऱ्यांपासून ते पीएमपीच्या महिला कर्मचाऱ्यांकडून सार्वजनिक स्वच्छतागृहाचा वापर होतो. मात्र, या गर्दीच्या ठिकाणी होणारी महिलांची गर्दी पाहता, त्या तुलनेत महिलांची स्वच्छतागृह नसल्याने अनेकींची गैरसोय होत आहे.

शहरातील मध्यवर्ती भागातील शनिपार, मंडई, मजूर अड्डा (फरासखाना पोलिस चौकीजवळ), बाजीराव रस्ता (हुजूरपागा शाळेजवळ), शनिवारवाडा या ठिकाणच्या महापालिकेच्या सार्वजनिक स्वच्छतागृहांचा दर्जा सुधारण्याची गरज असल्याचे प्रत्यक्ष पाहणीत समोर आले आहे. शनिपार, मंडई येथील स्वच्छतागृहे तुलनेने स्वच्छ असली, तरी काही ठिकाणी बादल्या आणि काही ठिकाणी दरवाजे तुटले आहेत; नळही गळके आहेत. बाजीराव रस्त्यावरील स्वच्छतागृह सुस्थितीत असले, तरी ते इमारतीच्या तळमजल्यावर असल्याने असुरक्षित वाटू शकते. फरासखाना पोलिस चौकीबाहेरच्या स्वच्छतागृहाची स्थिती बिकट असून, स्वच्छतागृहाबाहेरही कचरा असल्याने या स्वच्छतागृहाचा वापर करावा की नाही, असा संभ्रम निर्माण होत असल्याची स्थिती आहे.




> शहरातील बहुतांश महिला स्वच्छतागृहांत पाणी नसणे, नळ तुटलेले असणे या समस्या मुख्यत्वे दिसतात. दुर्गंधीमुळे सार्वजनिक स्वच्छतागृहांचा वापर टाळला जातो. अनेक ठिकाणी कचरापेटीही नसते. हे सर्वच आरोग्यासाठी घातक असल्याने शहरातील स्वच्छतागृहांची स्थिती सुधारणे आवश्यक वाटते
>
> \- ऋतुजा देशमुख, तरुणी

### शनिवारवाडा परिसरातील स्वच्छतागृह सुस्थितीत

शनिवारवाडा परिसरातील महापालिकेचे 'ती' स्वच्छतागृह स्वच्छ आहे. तेथील महिला कर्मचाऱ्यांकडूनही सहकार्य करण्यात येते. या ठिकाणच्या बेसिन, आरसे अशा सुविधाही चांगल्या आहेत. कोणताही वास, अस्वच्छता याला अपवाद ठरणारे हे स्वच्छतागृह आहे.

### मॉल किंवा हॉटेलचा पर्याय

**सार्वजनिक स्वच्छतागृहांचा वापर करण्याऐवजी महिला मॉल, हॉटेलचा पर्याय निवडतात. नाईलाजास्तव त्यांना मॉलमध्ये रेंगाळावे लागते. हॉटेल्समध्ये जाऊन विनाकारण पैसे खर्च करावे लागतात.**

### सुरक्षितता गरजेची

शनिपार, मंडई येथे महिला आणि पुरुषांची स्वच्छतागृहे शेजारी आहेत. प्रवेशद्वाराजवळच पुरुष ठेकेदार बसलेले असतात. त्यांच्याकडून स्वच्छतागृह वापरण्याबाबत शुल्क आकारण्यात येते. ठेकेदारांची महिलांशी बोलण्याची पद्धत, स्वच्छतागृहाचा परिसर असुरक्षित वाटण्यासारखा आहे. यासह शनिपार, मंडई, बाजीराव रस्ता या तिन्ही ठिकाणी असणाऱ्या स्वच्छतागृहांत शुल्क आकारण्याचे फलक लावलेले नाहीत.

> २००७पासून स्वच्छतागृहांच्या विषयावर मी भर देत आहे. त्यानंतर अर्थसंकल्पात ६० लाख रुपयांची तरतूद केली. मात्र, ठोस उपाययोजना झाल्या नाहीत. विविध योजनांतर्गत बांधलेली स्वच्छतागृहे बंदच आहेत. महानगरपालिकेने महिलांसाठी राबविलेली 'ती' योजनाही यशस्वी ठरली नाही. महिलांच्या आरोग्याच्या दृष्टीने हा प्रश्न अत्यंत महत्त्वाचा आहे; परंतु याबाबत उपाययोजना करण्याबाबत सर्वच पातळ्यांवर उदासीनता आहे.
>
> \- विजय कुंभार, राज्य संघटक, आप

# नऊवारी नेसून जगभ्रमंती करणाऱ्या चिंचवडच्या रमीला लटपटेला PM मोदींच्या सदिच्छा!

## मावळचे खासदार श्रीरंग बारणे यांच्या माध्यमातून रमीला-पंतप्रधानांची भेट

। पुणे। महाईन्यूज ।

**महिला दिनानिमित्त नऊवारी नेसून दुचाकीवरून जगभ्रमंती करणाऱ्या चिंचवडच्या रमीला लटपटे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची मंगळवारी दिल्लीत भेट घेतली. मावळचे खासदार श्रीरंग बारणे यांच्या माध्यमातून ही भेट झाली. संपूर्ण देश तुझ्यासोबत आहे, काय अडचण आल्यास संपर्क साधण्याचे आवाहन करत पंतप्रधान मोदी यांनी रमाबाईला पुढील प्रवासासाठी शुभेच्छा दिल्या.**

चिंचवड येथील रहिवासी असलेल्या रमिला लटपटे अहिल्या फाउंडेशन या स्वयंसेवी संस्थेच्या माध्यमातून महिला आणि तरुणांच्या सक्षमीकरणासाठी कार्यरत आहेत. आता 'रमा' (रायझिंग एबल मॅनकाईंड ऑल राऊंड) या जगभ्रमंती मोहिमेअंतर्गत त्या जगभ्रमंती करत आहेत. मुंबईतील गेट-वे-ऑफ इंडिया येथून त्यांच्या भ्रमंतीच्या प्रवासाचा ९ मार्च रोजी प्रारंभ झाला. त्या ८ मार्च २०२४ ला पुन्हा भारतात परतणार आहे.



रमिला लटपटे नऊवारी नेसून, नथ घालून ४० देशात जगभ्रमंती करत आहे. पुढीलवर्षीच्या ८ मार्च रोजी ती भारतात परत येणार आहे. पिंपरी-चिंचवड येथून सुरु झालेला प्रवास आज १५७२ किलोमीटर मोटरसायकल चालवत दिल्ली मध्ये पोहचला आहे. पंतप्रधान मोदी यांनी तत्काळ वेळ दिली आणि भेट झाली.

संपूर्ण देश तुझ्यासोबत आहे. तुला काहीही अडचण आली. तर माझ्या कार्यालयाशी संपर्क साध, संपूर्ण सहकार्य केले जाईल. व्हिजाची समस्या सोडविली जाईल. माझे आशिर्वाद तुझ्यासोबत आहेत, असे पंतप्रधान मोदी म्हणाले. पंतप्रधानांनी स्वीय सहाय्यकाला बोलवून घेत रमाबाईला पूर्णपणे सहकार्य करण्याच्या सूचना केल्या

### धाडसी प्रवास, धाडसी निर्णय

**सामाजित कार्यकर्त्या असलेल्या रमिला यांचा या प्रवासामागचा उद्देश म्हणजे महाराष्ट्राच्या संस्कृती सोबत राज्यातील सर्व खास वैशिष्ट्ये जगासमोर आणणे होय. रमिला इंडियन कल्चरला प्रमोट करण्यासाठी हा धाडसी प्रवास करणार आहे. या प्रवासात त्या जवळपास १ लाख किलोमीटरचा बाइक्सचा प्रवास करणार आहे. या वर्षभरात ३० हून जास्त देशात जाणार आहेत. या प्रवासाचे खास वैशिष्ट्ये म्हणजे रमिला हा संपूर्ण प्रवास साडी नेसून करणार आहेत.**

# पीएमपी चालक असुरक्षित?

## राष्ट्रवादीचे पोलिसांना निवेदन: अडीच महिन्यांत मारहाणीच्या 38 घटना

।पिंपरी ।
।महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**पिंपरी : पुणे महानगर परिवहन महामंडळाच्या (पीएमपी) बसवरील चालक व वाहकांना मारहाणीच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे. गेल्या अडीच महिन्यांत मारहाणीच्या ३८ घटना घडल्या आहेत. चालक व वाहकांना मारहाण करणाऱ्यांवर कठोर कारवाई होत नसल्यामुळे प्रकार वाढत आहेत. अशा प्रकारातील दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी पीएमपीएमएल राष्ट्रवादी महाराष्ट्र जनरल कामगार युनियनकडून पोलिस आयुक्तांकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.**



गेल्या काही महिन्यांपासून पीएमपीच्या चालक व वाहकांना किरकोळ कारणांमुळे मारहाणीचे प्रकार वाढले आहेत. 'गाडीला कट मारला, बाजू दिली नाही, बसचा धक्का लागला' अशा विविध कारणांवरून चालक व वाहकांना मारहाण केली जात आहे. दोन दिवसांपूर्वी अभिनव चौकात गाडीला बसचा धक्का लागला, म्हणून माजी नगरसेविका व त्यांच्या कार्यकर्त्यांनी चालकास जबर मारहाण केली होती. यापूर्वी बस अडवून मारहाण केल्याचा प्रकार घडला होता. मारहाण करणाऱ्यांवर गुन्हेदेखील दाखल करण्यात येत आहेत.

पुणे आणि पिंपरी-चिंचवड शहराची महत्त्वाची सार्वजनिक वाहतूक व्यवस्था म्हणून 'पीएमपी'कडे पाहिले जाते. १६५० बसच्या माध्यमातून 'पीएमपी' सेवा देत आहे. 'पीएमपी'कडे दोन हजार २९६ चालक आणि चार हजार ७७६ वाहक आहेत.

यामधून दिवसाला १२ लाखांपर्यंत प्रवासी प्रवास करतात. प्रमाणिकपणे सेवा देताना गुंड प्रवृत्तीच्या व्यक्तींकडून वाहकांना मारहाणीचे प्रकार घडत आहेत. गेल्या अडीच महिन्यांत पुणे व पिंपरी-चिंचवड परिसरात वाहक व चालकांना मारहाणीच्या ३८ घटना घडल्या आहेत. यामध्ये काही थेट प्राणघातक हल्ले करण्यात आले आहेत. यामुळे पीएमपीच्या कामगारांमध्ये भीतीचे वातावरण आहे. अशा घटनांमुळे कामगारांची मनस्थिती बिघत आहे. मात्र, मारहाण करणाऱ्यांवर कठोर कारवाई होताना दिसत नाही. त्यामुळे अशा घटनांत वाढ होत आहे.

'वाहक व चालकांना मारहाण करणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी; अन्यथा पीएमपीचे कामगार आंदोलन करतील. त्यामुळे शांतता भंग होण्याची शक्यता आहे. त्यामुळे पोलिस आयुक्तांनी दोषींवर कठोर कारवाई करावी,' असे पीएमपीएमएल राष्ट्रवादी महाराष्ट्र जनरल कामगार युनियनकडून मागणीत म्हटले आहे.

### दोन वर्षांच्या शिक्षेची तरतूद

**'पीएमपी' कर्मचाऱ्यांना कामावर असताना मारहाण केल्यास संबंधितावर सरकारी कामात अडथळा आणल्याचा भारतीय दंड संहिता कलम ३५३ नुसार गुन्हा दाखल केला जातो. त्यामध्ये दोन वर्षांपर्यंत शिक्षा आणि दंडाची तरतूद आहे. तसेच, वादविवाद टाळण्याचे पीएमपी चालक आणि वाहकांना प्रशिक्षण देण्यात येते. पण, त्यांच्यावर कोणी हल्ला केल्यास स्वतःचे संरक्षण करण्याचा त्यांना अधिकार आहे. खासगी वाहनचालकांनी सार्वजनिक वाहतुकीला पहिले प्राधान्य द्यावे. त्यामुळे वादावादीचे प्रकार घडणार नाहीत, अशी प्रशासनाची भूमिका आहे.**

---

# टाकाऊ वस्तूंपासून पक्ष्यांसाठी चारा- पाणी

## आरोग्य विभागाच्या कर्मचाऱ्यांचा उपक्रम : पक्षी संवर्धनासाठी जनजागृती

।पिंपरी।
।महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**पिंपरी : शहरात आता उन्हाळ्याला सुरवात झाली असून, तापमानात वाढ होत आहे. नदी नाल्यांमधील पाणी आटले आहे. त्यामुळे कचऱ्यातील टाकाऊ वस्तूंचा उपयोग करून, त्यापासून पक्षांसाठी चारा पाण्याची सुविधा उपलब्ध करण्याचा उपक्रम महापालिका आरोग्य विभागाच्या कर्मचाऱ्यांनी राबवला. तसेच "ड" क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत येणाऱ्या परिसरात लोकांमध्ये पक्षी संवर्धनासाठी जनजागृती केली.**



दिवसेंदिवस चिमणी, कावळे यांच्यासारखे पक्षी दुर्मिळ होत चालले आहेत. भीषण उन्हाळा बघता बऱ्याच वेळी पक्षांना खाद्यपदार्थ, पिण्याचे पाणी उपलब्ध होत नाही. त्यामुळे त्यांचा जीवसुद्धा जातो. त्या अनुषंगाने कर्मचाऱ्यांनी कचऱ्यातील टाकाऊ वस्तूंवर रिसायकलिंग करून, त्यापासून चिमण्यांना ऊन, वारा, पावसापासून संरक्षण व्हावे, यासाठी कृत्रिम घरटे बनवली.

मातीची भांडे, प्लॅस्टिकचे डबे यांचा वापर करून पक्ष्यांना पिण्यासाठी पाणी आणि धान्य ठेवण्याची व्यवस्था केली. अशा वस्तू विविध उद्यान परिसर व झाडांवर अडवण्यात आल्या. जेणेकरून पक्षांना आपली तहान- भूक भागवता येईल.

'ड' क्षेत्रीय अधिकारी उमाकांत गायकवाड, सहायक आरोग्य अधिकारी महेश आढाव, मुख्य आरोग्य अधिकारी अतुल सोनवणे, रोहित चंदेल, सुखदेव लोखंडे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभाग क्रमांक २६ मधील बेसिक्स टीमने हा उपक्रम राबवला.

या अभिनव उपक्रमांमध्ये टीम बेसिक्सचे प्रतिनिधी माधुरी पाटील, पार्वती कळसे, ज्योती केंगार, नवनाथ लोंढे, लखन जाधव, गौतम कांबळे, ओंकार क्षीरसागर, क्षितिज गायकवाड, सागर शिंदे, रवी राठोड यांच्यासह शाळेतील मुलांनी सहभाग नोंदवला.

> **"आज शहरात चिमण्यांची संख्या कमी होत चालली आहे. खरं म्हणजे भारतात सगळीकडे सर्वात जास्त संख्येने सापडणारा, विणीचा हंगाम वर्षभर असू शकणारा, माणसाच्या जवळपास राहणारा आणि त्यामुळे नेहमी दिसणारा पक्षी अशी चिमणीची ओळख आहे. परंतु दिवसेंदिवस होत चाललेल्या बदलामुळे आता चिमण्यांच्या वास्तव्याला धोका निर्माण झाला आहे. यासाठी जागरूकता निर्माण करण्यासाठी हा उपक्रम आम्ही राबवला.**
> **- सुखदेव लोखंडे, प्रमुख, प्रभाग क्रमांक २६.**

## संपादकीय

# भारतीय व्यूहरचनेचा ‘महासेतू’

***आंतरराष्ट्रीय उत्तर-दक्षिण कॉरिडॉर भारतासाठी अधिक उपयोगी ठरणार आहे. त्यामुळे व्यापाराला चालना मिळणार हा फायदा आहेच. परंतु रेशीममार्गाच्या जाळ्याद्वारे चीन वाढवत असलेल्या वर्चस्वाला शह देण्यासही याचा उपयोग भारताला होऊ शकेल.***

नजीकच्या भूतकाळात आंतरराष्ट्रीय राजकारणात दोन ऐतिहासिक घटना घडल्या. या दोन्हीही घटनांमुळे मुंबईच्या न्हावाशेवा म्हणजे जवाहरलाल नेहरू पोर्ट या बंदराचे भाग्य उजळले. या बंदरातून सागरी तसेच खुश्कीच्या (म्हणजे जमिनीवरच्या) मार्गाने थेट युरोपीय देशांचे किनारे गाठतां येतील. भारताच्या धनाची, वेळेची आणि ताकदीची बचत होईल. व्यापाराला सुगीचे दिवस येतील, असे जाणकारांचे म्हणणे आहे. या उपक्रमाला ‘इंटरनॅशनल नॉर्थ साउथ ट्रान्सपोर्ट अँड ट्रेड कॉरिडॉर’ हे नामानिधान आहे. या महामार्गाचे महत्त्व समजून घेतले पाहिजे.

रशिया-युक्रेन संघर्षाला २४ फेब्रुवारीस एक वर्ष झाले तेव्हां व्लादिमीर पुतीन यांनी त्यांच्या भाषणात या महामार्गाचा मुद्दाम उल्लेख केला. युक्रेनवर रशियाने केलेल्या हल्ल्याला वर्ष उलटले तरी अपेक्षित यश न मिळाल्याने पुतीन नाराज झाले. युक्रेनच्या राजधानीवर म्हणजे कीव्ह शहरावर फारतर आठवड्यात कब्जा मिळण्याची रशियन राजकर्त्यांची अपेक्षा होता. प्रत्यक्षात रशियाला कीव्ह घेण्याचा हट्ट सोडून द्यावा लागला, नुकसान सोसावे लागले. काळ्या समुद्रातली ‘मस्क्वा’ नामक अण्वस्त्रसज्ज युद्धनौका युक्रेनने बुडवली. रशियाचा पंचनामा झाला.मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा निषेधही करून झाला. मागण्यांसाठी आंदोलन करणे, सरकारला जाब विचारणे हा सरकारी कर्मचाऱ्यांचाच नव्हे, तर सर्वसामान्य नागरिकांचाही हक्क आहे. राज्य कर्मचा-यांच्या आंदोलनाला त्यामुळेच अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या पार्श्वभूमीवर आमचा आणि कुणाचाच विरोध नाही. मात्र शिंदे-फडणवीस सरकार सत्तेत आल्यानंतरच अशी आंदोलने का सुरू व्हावीत, हा पीएच.डी. प्रबंधाचा विषय होण्यास हरकत नाही. डिसेंबर २०१९ ते जून २०२२ अशी सुमारे अडीच वर्षे कॉँग्रेस- राष्ट्रवादी- शिवसेनेचे सरकार राज्यात सत्तेत होते.

# चांगल्या समाजासाठी वृत्तपत्रांची गरज आहे






आजच्या काळात वृत्तपत्रे किंवा पत्रकारिता ही मिशन किंवा समाजसेवा नसली तरी वाकडे पाऊल टाकताना किंवा पडल्यावर आपल्याला कुणीतरी जाब विचारणारा आहे याची जरब वृत्तपत्रे बेईमान लोकांच्या मनात निर्माण करीत असतात. एखाद्या प्रकरणात नागवला गेलेला सामान्य माणूस शेवटची आशा म्हणून आजही वृत्तपत्रांकडे,पत्रकारांकडे बघतो कारण न्यायालयात जाण्याची त्याची आर्थिक ताकद नसते आणि आधीच्या सगळ्या यंत्रणा मूठभर बेईमान लोकांनी खिश्यात घातलेल्या असतात. अशावेळी गावभर दवंडी देणारा वृत्तपत्र हाच एकमेव पाठीराखा त्याला आधार देत असतो. पत्रकार आणि वृत्तपत्रे खिश्यात टाकली जात नाहीत का ? असा प्रश्न ज्यांच्या डोक्यात असेल त्यांना आम्ही सांगू इच्छितो की आता माध्यमांच्या कक्षा रुंदावल्या आहेत,डिजिटल आणि ऑनलाईन मीडियामुळे कोणतीही बातमी फारकाळ कुणालाही दाबून ठेवता येत नाही ,प्रत्येकाच्या बोटांवर चालणारा सोशल मीडिया हा तर कुणाच्याही प्रभावात येऊ शकणार नाही.

भारतात चोवीसतास चालणाऱ्या वृत्तवाहिन्या आल्यावर वृत्तपत्रांचे काही खरे नाही अशी काळजी या क्षेत्राला लागली होती मात्र त्यानंतर भारतात अनेक मीडिया हाऊसने अनेक राज्यात वृत्तपत्रे सुरु करून खपाचा उच्चांक गाठल्याचे दिसते. वाचकसंख्या पूर्वीच्या तुलनेत कमी झाली आहे हे वास्तव आहे, त्यात कोरोनाच्या काळात सगळ्याच वृत्तपत्रांचा खप घसरला त्याला अफवा आणि गैरसमज कारणीभूत होते परंतु त्याचा फटका बसला हे खरे आहे. दररोज घरी येणारे वृत्तपत्र कोणताही आजार घरी आणत नाही उलट ते येण्यामुळे घरात,कुटुंबात ज्ञान,माहिती,मनोरंजन आणि सामान्य ज्ञानाची समृद्धी येते हे आता कुणीही अमान्य करणार नाही. भल्या पहाटे घराच्या अंगणात आराम खुर्चीवर बसून आजोबा,वडील वृत्तपत्र वाचताहेत हे दृश्य बघून घरातल्या मुलांना वाचनाची गोडी लागते आणि त्यातून भावी पिढ्या वाचायला लागतात ,त्यातूनच वैचारिक समृद्ध बनतात हे सत्य नाकारता येत नाही.

आजच्या स्पर्धेच्या काळात नोकरी, व्यवसाय किंवा राजकारण अश्या असंख्य क्षेत्रात ज्या सामान्य ज्ञानाची गरज भासते त्याचा घरी येणारे वृत्तपत्र हा अखंड झरा असते. ज्यांच्या घरात वृत्तपत्र येत नाही त्या घरातील विद्यार्थ्यांना पुढे सामान्य ज्ञानासाठी लाखभर रुपये भरून कोचिंग क्लास लावावे लागतात. स्पर्धा परीक्षा देणाऱ्यांना तर जे पायाभूत सामान्य ज्ञान हवे असते ते दररोज देण्याचे काम वृत्तपत्र नियमित करीत असते. एका वृत्तपत्राच्या संपादकीय पानावर दार महिन्याला किमान २५ विविध प्रकारचे विषय हाताळले जात असतात त्यात जगभरातील ताज्या घडामोडींचे संदर्भ देऊन विविध क्षेत्रात सध्या काय सुरु आहे याचा आढावा घेतला जातो हा ज्ञानाचा खुराक प्रयत्न करूनही एवढ्या सहज आणि अल्प मूल्यात कुठेही मिळण्याची सध्यातरी सोय कुठेही दिसत नाही. हे सगळे सध्या करायचे असेल आणि घरात वाढणाऱ्या पिढ्या अष्टपैलू व्हाव्यात असे वाटत असेल तर त्यांना वृत्तपत्रे वाचण्याची सवय लावावी लागेल,त्यासाठी स्वतः वाचक व्हावे लागेल.

टीव्ही चॅनेल्सचा भडीमार आणि ऑनलाईन पर्याय उपलब्ध असताना आजही समाजाचा सर्वात जास्त भरवसा दररोज सकाळी घरी येणाऱ्या वृत्तपत्रावर असतो ,भलेही काही वृत्तपत्रांच्या चवचाल धोरणामुळे वाचक संख्या कमी झाली असेल पण वृत्तपत्रांवरील अतूट विश्वास कायम आहे याला कारण प्रामाणिकता जपत पत्रकारिता करणारी काही वृत्तपत्रे आणि सत्याचा शोध घेणारे पत्रकार आहेत. गावात किंवा शहरात असणाऱ्या डझनभर पत्रकारांपैकी कोण प्रामाणिक आहे याची उत्तम जाण त्या शहरातील नागरिकांना असते इतरांकडे हेच लोक उडदामाजी काळेगोरे म्हणून दुर्लक्ष करीत असतात. आजही जिल्हास्तरीय वृत्तपत्रांच्या एका ग्रामीण पानावर प्रकाशित झालेल्या किमान २५ बातम्यात तीनचार बातम्या अश्या असतात की ज्यामुळे कुणाची तरी समस्या सरकारी दरबारी ऐकलेली असते

# कष्टकऱ्यांच्या सुरक्षाकवचाचे काय?

**असंघटित क्षेत्रातील कष्टकऱ्यांना कायद्याने लागू केलेले किमान वेतन मिळत नाही. जे मिळते ते लगेच खर्च होते. अशा कष्टकऱ्यांनी गेली दोन-तीन दशके संघटित क्षेत्रातील कामगारांना मिळते तसे सामाजिक सुरक्षाकवच आम्हालाही लागू करावे, या मागणीसाठी असंख्य मोर्चे काढले, सरकारशी बोलणी केली, काही मागण्या तत्त्वत: मंजूर करून घेतल्या; पण प्रत्यक्ष अंमलबजावणीत हे आवश्यक तेवढे प्रभावी पद्धतीने उतरले नाही.**

सध्या सर्वत्र पेन्शनबाबत मोठी चर्चा चालू आहे. सरकारी कर्मचाऱ्यांच्या आंदोलनामुळे या चर्चेला वेग तर आला आहेच; पण अनेक बाजू समोर येत आहेत. नवी पेन्शन योजना, जुनी पेन्शन योजना हे शब्द सतत कानांवरून, डोळ्यांखालून जात आहेत आणि त्याचबरोबर पेन्शन उत्पादकतेशी जोडली जावी, पेन्शन कशाला द्यायला हवी?, पैसा विकासावर खर्चावा... नसत्या बाबींवर नको, असेही मुद्दे मांडले जात आहेत. एकंदर गदारोळ माजला आहे, हे खरे. लोक न्यायालयात गेले आहेत, आंदोलनाच्या पवित्र्यात आहेत, तेव्हा या सर्व मुद्द्यांची साधक बाधक चर्चा होईल आणि निर्णयसुद्धा होतील.

या पार्श्वभूमीवर दोन मोठे आणि पूर्णपणे निराळे नि महत्त्वाचे मुद्दे इथे मांडावेसे वाटतात. त्यांच्याकडे वळताना क्षीण आवाजात गेली २५-



३० वर्षे दिली जाणारी एक घोषणा कानात रेंगाळली आहे, तिच्याकडे लक्ष वेधावेसे वाटते; ही घोषणा आहे, ‘म्हातारपणाचे करायचे काय; पेन्शन घेतल्याशिवाय राहणार नाय,’ ही घोषणा आहे हातावर पोट असलेल्या सुमारे ९० ते ९३ टक्के कष्टकऱ्यांची. पगारवाढ, बोनस, भरपगारी रजा, भविष्यनिर्वाह निधी, निवृत्तिवेतन वगैरे तर जाऊच द्या; पण रोजगाराची कोणतीही शाश्वती नसलेल्या, केलेल्या कामाचा किमान मोबदला न मिळणाऱ्या कोट्यवधी कुटुंबांची ही घोषणा आहे. घरात पिठ आहे तर मीठ नाही, अशी अवस्था असलेल्या या माणसांची संख्या शंभरात ९०च्या वर असूनही त्यांचा आवाज क्षीण आहे. तो ना सरकारच्या, ना देशातील अन्य नागरिकांच्या कानांवर पडत... कारण हा आवाज उठवणारे संघटित नाहीत. असंघटित क्षेत्रातील कष्टकऱ्यांना जिथे कायद्याने लागू केलेले किमान वेतन किंवा मोबदलासुद्धा मिळत नाही. वर्षाचे शंभर दिवससुद्धा हाताला काम मिळेल याची शाश्वती नाही, ज्यांचे सारे आयुष्य ठिगळे लावण्यात संपून जाते, अशा फाटक्या माणसांना ही पेन्शनची घोषणा का द्यावी वाटली?मुळात कुटुंबाचे भागेल इतके उत्पन्न नाही. जे मिळते ते लगेच खर्च होते.

## ।। अभंगवाणी ।।



तीळ जाळिले तांदुळ ।
काम क्रोधे तैसे चि खळ ॥१॥
कां रे सिणलासी वाउगा ।
न भजतां पांडुरंगा ॥ध्रु.॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक ः *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक ः MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# गुढीपाडवा मेळाव्यातून राजगर्जना!

## “कोर्टाच्या निर्णयावर अवलंबून असलेलं सरकार, राज ठाकरेंचा हल्लाबोल!

। मुंबई। महाईन्यूज ।

**मनसेच्या पाडवा मेळाव्यामध्ये राज ठाकरेंचं भाषण हा प्रमुख आकर्षणाचा आणि अवघ्या राज्याच्या राजकीय वर्तुळातला चर्चेचा विषय असतो. यंदा मनसेच्या पाडवा मेळाव्यात राज ठाकरेंनी केलेलं भाषणही तसाच चर्चेचा विषय ठरलं आहे. राज ठाकरेंनी आपल्या भाषणात वेगवेगळ्या राजकीय मुद्द्यांवर भाष्य केलं आहे. यावेळी मनसे आणि शिंदे गटाच्या युतीची घोषणा होण्याची शक्यता वर्तवली जात होती. मात्र, तशी कोणतीही घोषणा राज ठाकरेंनी केली नसून उलट एकनाथ शिंदेंनाच खोचक सल्ला दिला आहे. तसेच, शिंदे गटाच्या आमदारांच्या अपात्रतेच्या मुद्द्यावर सर्वोच्च न्यायालयात सुनावणी चालू असल्याबाबतही राज ठाकरेंनी टोला लगावला आहे**



### “सगळे सरकारकडे बघतायत आणि सरकार...!”

“कशा प्रकारचं राजकारण महाराष्ट्रानं पाहिलंय आणि कशा प्रकारचं राजकारण महाराष्ट्र बघतोय. नवीन उद्योग दिसत नाहीयेत. बेरोजगारी आ वासून उभी आहे. शेतकरी, महिला, विद्यार्थी सरकारकडे बघतायत आणि सरकार कोर्टाकडे बघतंय. आमचं काय होणार? आमचा निर्णय कधी लागतोय? असं कोर्टावर अवलंबून असलेलं सरकार मी आजपर्यंत पाहिलं नाही”, असं राज ठाकरे यावेळी म्हणाले.

“नाही लोकांनी तुमच्या तोंडात चिखल घातला तर बघा”

“आत्ताची राजकीय परिस्थिती पाहाता सगळ्यांनी एकदा ठरवा आणि अत्ताच विधानसभा निवडणुका लावा. जो काय सोक्षमोक्ष व्हायचा तो एकदा होऊनच जाऊन दे. जो काही चिखल केलाय, तो नाही नागरिकांनी तुमच्या तोंडात घातला तर बघा. नवीन नवीन मुख्यमंत्री आहेत, समजू शकतो आपण. करा काम नीट”, अशा शब्दांत राज ठाकरेंनी सत्ताधारी आणि विरोधकांनाही इशारा दिला आहे.

### “मुख्यमंत्र्यांना एकच सांगतो, उद्धव ठाकरेंच्या मागून...”

».“१९ जूनला आपल्याला कळलं की एकनाथ शिंदे आमदार घेऊन गेले सुरतला. मला आजपर्यंत एवढंच माहिती होतं की महाराज सुरतहून लुट करून इथे आले. महाराष्ट्रातून लूट करून सुरतला गेलेले हे पहिलेच. मग गुवाहाटी, गोवा करत करत आता ते मुख्यमंत्री म्हणून बसले.एकनाथ शिंदेंना मला फक्त एवढंच सांगायचंय की तुम्ही महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून बसले आहात, राज्यासाठी काम करा. उद्धव ठाकरे जिथे सभा घेतायत, त्यांच्या मागून सभा घेत बसू नका. त्यांनी वरळीला घेतली, यांनी वरळीला घेतली. त्यांनी खेडला घेतली, यांनी खेडला घेतली. गुंतवून ठेवतील. महाराष्ट्राचं काय? एवढे महाराष्ट्रात प्रश्न प्रलंबित आहेत”, असा सल्लाही राज ठाकरेंनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना दिला आहे.

### ''महाराष्ट्रात लूट करुन सुरतला गेलेले एकनाथ शिंदे पहिलेच”

»“मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी मनसेच्या गुढीपाडवा मेळाव्यातून चौफेर टीका केली आहे. शिवसेना आमदारांच्या बंडखोरीवरही राज ठाकरेंनी भाष्य केलं. यावेळी त्यांनी बंडखोर आमदारांचा उल्लेख अलीबाबा आणि त्याचे चाळीसजण असा केला. दरम्यान, त्यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावरही निशाणा साधला. राज ठाकरे भाषणात म्हणाले, “जूनमध्ये सगळा तमाशा झाला. अलीबाबा आणि त्यांचे चाळीसजण सुरतला गेले. त्यांना चोर म्हणता येणार नाही कारण ते चोर नाहीत. यांनाच (उद्धव ठाकरे) कंटाळून त्यांनी शिवसेना सोडली. कोव्हिडच्या काळात उद्धव ठाकरे कुणालाच भेटायला तयार नव्हते. एक आमदार आपल्या मुलाला घेऊन उद्धव ठाकरेंना भेटायला गेला. त्यावेळी उद्धव ठाकरेंनी त्या मुलाला बाहेर ठेवलं आणि आमदाराला भेट दिली. हे असं वागल्यानंतर २१ जूनला कळालं आपल्याला एकनाथ शिंदे आमदारांना घेऊन सुरतला गेले. मग पुढे गुवाहाटीला गेले.” “आजपर्यंत मला एवढंच माहीत होतं की, शिवाजी महाराज सुरतहून लूट करून महाराष्ट्रात आले होते. पण महाराष्ट्रातून लूट करून सुरतला गेलेले एकनाथ शिंदे पहिलेच आहेत. मग गुवाहाटी आणि गोवा असा प्रवास करत एकनाथ शिंदे मुख्यमंत्री म्हणून बसले. पण एकनाथ शिंदेंना मला एकच सांगायचं आहे की, महाराष्ट्रासाठी काम करा. उद्धव ठाकरे जिथे सभा घेतात तिथे उत्तर द्यायला सभा घेऊ नका. सरकारी कर्मचाऱ्यांच्या पेन्शनचा विषय अडकला आहे तो विषय मिटवा. शेतकऱ्यांचे विषय आहेत ते सगळे प्रश्न हाती घ्या. अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचं नुकसान झालं आहे, त्यांना भेटा... सभा घेत फिरू नका?” असंही राज ठाकरे म्हणाले.

---

### पोलिसांचं पथक कर्नाटकात, 10 कोटींची मागणी

# नितीन गडकरी धमकी प्रकरणाचं बेळगाव कनेक्शन

## » कारागृहातून फोन; १० कोटींसाठी तरुणीचा गुगल पे नंबर, गूढ उकललं

।नागपूर महाईन्यूज ।

**केंद्रीय परिवहन मंत्री नितीन गडकरी यांच्या खामल्यातील जनसंपर्क कार्यालयात पुन्हा दहा कोटीच्या खंडणीसाठी फोन करून धमकी देण्यात आली. ही घटना मंगळवारी सकाळी उघडकीस आली. या घटनेने पोलिसांमध्ये खळबळ उडाली आहे. मोबाइल क्रमांकावरून आलेल्या क्रमांकाची पोलिसांनी चौकशी केली असता तो बेळगावमधील कारागृहातून शिक्षा भोगत असलेल्या जयेश ऊर्फ जपेश कांथा ऊर्फ साकीर ऊर्फ साहिर याने केल्याचे स्पष्ट झाले. याप्रकरणी धंतोली पोलिसांनी गुन्हा दाखल केला. पोलिसांचे पथक मंगळवारी सायंकाळी चौकशीसाठी बेळगावला रवाना झाल्याची माहिती आहे.**

### नेमकं काय घडलं?

मंगळवारी सकाळी १०.४५ वाजताच्या सुमारास नेहमीप्रमाणे कार्यालयीन कर्मचारी काम करीत होते. यादरम्यान फोन खणखणला, समोरुन आवाज आला मी ‘डी’ (दाऊद) टोळीचा सदस्य जयेश बोलत आहे. मला दहा कोटी रुपये न दिल्यास गडकरींचा घातपात करेल,अशी धमकी त्याने दिली. त्यानंतर ११.१५ वाजतापर्यंत जयेशने नाव घेऊन आणखी दोन वेळा कार्यालयात फोन केला. अवघ्या अर्धा तासांत तीनवेळा फोन आल्याने कार्यालयातील कर्मचाऱ्यांनी धंतोली पोलिसांना माहिती दिली. माहिती मिळताच वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांसह पोलिसांचा प्रचंड ताफा तेथे पोहोचला. आणि पोलिसांनी माहिती घेतली.

सायबर पोलिसांच्या मदतीने फोन करणाऱ्याचा शोध सुरू केला. मोबाइलचे लोकेशन बेळगाव कारागृह आढळून आले. जयेशनेच धमकीचा फोन केल्याची खात्री पटली. यापूर्वी १४ जानेवारीलाही जयेशने बेळगावच्या कारागृहातून गडकरींच्या याच कार्यालयात फोन करून १०० कोटींची मागणी केली होती. याप्रकरणात धंतोली पोलिसांनी



जयेशची चौकशीही केली. मात्र त्याने कोणतीही माहिती दिली नाही. पोलिसांनी त्याच्या संपर्कात असलेल्या आठ जणांचे जबाब नोंदविले होते.

### जयेशविरुद्ध एक डझन गुन्हे

जयेशविरुद्ध एक डझनपेक्षा अधिक गंभीर स्वरुपाचे गुन्हे दाखल आहेत. २ ऑगस्ट २००८ मध्ये कर्नाटकातील पुत्तूर येथे वहिणी सौम्या व अल्पवयीन पुतणीची निर्घृण हत्या करून जयेश हा फरार झाला. जयेश हा केरळमध्ये वास्तव्यास होता. तब्बल चार वर्षे तो केरळात राहिला. दुहेरी हत्याकांडात २०१२ मध्ये जयेशला केरळमधून कर्नाटक पोलिसांनी अटक केली. न्यायालयात याप्रकरणाचा खटला चालला. २०१६ मध्ये न्यायालयाने त्याला शिक्षा ठोठावली. तेव्हापासून तो बेळगाव कारागृहात शिक्षा भोगत आहे. २०१८ ते २०२० या कालावधीत जयेश हा तीन वेळा कारागृहातून फरार झाला होता,अशी माहिती आहे.

### गुगल पेद्वारे 10 कोटी पाठवा

» जयेशने फोन करून एका तरुणीचा क्रमांक कर्मचाऱ्यांना दिला. गुगुल पेद्वारे दिलेल्या क्रमांकावर १० कोटी रुपये वळते करा,अन्यथा गंभीर परिणामाला सामोर जावे लागेल,अशी धमकी त्याने दिली. पोलिसांनी जयशेने दिलेल्या क्रमांकाचा शोध घेतला. हा क्रमांक एका तरुणीचा असून ती बंगळूरु येथे राहाते. ती इव्हेंन्ट मॅनेजर आहे. काही दिवसांपूर्वी तरुणीच्या मित्राला एका प्रकरणात पोलिसांनी अटक केली. त्यानंतर तो बेळगाव कारागृहात आहे.याचदरम्यान मित्राने जयेशच्या मोबाइलक्रमांकावरून तरुणीशी संपर्क साधला. त्यामुळे जयेशने तरुणीचा क्रमांक दिला. याप्रकरणात तरुणी व तिच्या मित्राचा सहभाग आहे का,हे चौकशीनंतर स्पष्ट होईल,अशी माहिती पोलिसांनी दिली.

# जागतिक अर्थसंकटाच्या झळा!

## बँकिंग संकटाची झळ भारतातही; 20 लाख कोटींचा व्यवसाय संकटात!





। मुंबई। महाईन्यूज ।

**जागतिक बँकिंगची त्सुनामी अमेरिकेतून बाहेर पडून आता युरोप आणि इतर देशांकडे सरकत आहे. त्याचा परिणाम जागतिक स्तरावरील सर्व कंपन्यांवर दिसून येत असून त्याची झळ भारतातही जाणवत आहे. तज्ज्ञांचे म्हणणे आहे की, या बँकिंग संकटाच्या सुनामीमध्ये भारताला २० लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त म्हणजेच २४५ अब्ज डॉलर्सच्या व्यवसायाचे नुकसान होऊ शकते.**

: अमेरिका आणि युरोपमधील बँकिंग संकट दिवसेंदिवस वाढत आहे. अमेरिकेत सिलिकॉन व्हॅली बँक आणि सिग्नेचर बँक या दोन बँका बुडाल्या असून इतर अनेक बँका आपले अस्तित्व वाचवण्यासाठी धडपडत आहेत. युरोपातील सर्वात मोठ्या बँकांपैकी एक असलेल्या क्रेडिट सुईसची स्थिती वाईट आहे. आता त्याची झळ भारतातही जाणवत आहे. यामुळे भारताच्या २४५ अब्ज डॉलर (सुमारे २० लाख कोटी रुपये) च्या आयटी बिझनेस प्रोसेस मॅनेजमेंट (IT-BPM) उद्योगाचे भविष्य धोक्यात आले आहे.

विश्लेषकांचे म्हणणे आहे की, उद्योगाच्या उत्पन्नापैकी ४१% महसूल बँकिंग, वित्तीय सेवा आणि विमा क्षेत्रातून (BFSI) येतो. जगातील मोठ्या बँका कोलमडल्यामुळे या क्षेत्राच्या महसुलावर वाईट परिणाम होऊ शकतो. या बँका केवळ त्यांच्या सध्याच्या टेक बजेटमध्ये कपात करू शकत नाहीत तर पुढील सौदे देखील बंद करू शकतात.

**टीसीएस, इन्फोसिसवर परिणाम**

विश्लेषकांचे म्हणणे आहे की, बँकिंगचे संकट अधिक गडद झाल्यास त्याचा सर्वाधिक परिणाम टीसीएस, इन्फोसिस, विप्रो आणि एलटीआईमाइंडट्री या कंपन्यांवर होऊ शकतो. याचे कारण म्हणजे या कंपन्यांचा सर्वात जास्त व्यवसाय अमेरिकेच्या वित्तीय संस्थांबरोबर आहे.

एचएफएस रिसर्चचे संस्थापक फिल फर्श म्हणतात की अमेरिकेतील प्रादेशिक बँकांची स्थिती गंभीर आहे. त्यामुळे त्यांना सेवा देणाऱ्या कंपन्यांमध्ये घबराट निर्माण झाली आहे. यामध्ये टीसीएस आणि इन्फोसिसचा समावेश आहे. फर्श म्हणाले, मी या आठवड्यात एका आयटी फर्मच्या सीईओशी बोललो. ते म्हणाले की, संपूर्ण क्षेत्रात दहशतीचे वातावरण आहे.

आयटी सल्लागार संशोधन संस्था एव्हरेस्ट ग्रुपचे संस्थापक पीटर बेंडर-सॅम्युअल, यांच्या मते, टीसीएस, इन्फोसिस, विप्रो आणि एलटीआईमाइंडट्री यांनी त्यांच्या बँकिंग वर्टिकलद्वारे उत्तर अमेरिकेतील प्रादेशिक बँकांशी संपर्क साधला आहे. बँकिंग संकटाचा परिणाम त्यांच्या व्यवसायावर अल्पावधीत होईल.

### महागाई वाढली की बँका कर्जाचे हप्तेही वाढवतात, हे आहे त्यामागचं कारण

- जागतिक बँकेच्या संकटाची झळ भारतालाही जाणवणार
- बँकिंग संकट अमेरिका-युरोपकडून इतर देशांकडे सरकतंय
- या संकटाच्या सुनामीमध्ये भारताचे 20 लाख कोटींपेक्षा जास्त नुकसान होऊ शकते

### उत्तर अमेरिकेतील बँका आघाडीवर

».जगभरातील रिटेल बँकिंग क्षेत्रात तंत्रज्ञानामध्ये गुंतवणूक करण्यात उत्तर अमेरिकेतील बँका आघाडीवर आहेत. वित्तीय सल्लागार कंपनी सेलेंटच्या आकडेवारीनुसार, २०२२ मध्ये या बँकांचे आयटी बजेट ८२ अब्ज डॉलर होते. तर जागतिक बजेट २५० अब्ज डॉलर होते. टेक बजेटवर बँकांच्या खर्चाचा भारतीय आयटी कंपन्यांना खूप फायदा झाला.

### BFSI मधून महसूल

**»नॅसकॉम या आयटी उद्योगातील संघटनेनुसार, २०२३ या आर्थिक वर्षात ४१ टक्के महसूल BFSI मधून आला. यामध्ये उत्तर अमेरिकेचा वाटा ५० टक्क्यांहून अधिक आहे. तर विप्रोच्या ३५% महसूल BFSI मधून येतो. त्याचप्रमाणे देशातील सर्वात मोठी आयटी कंपनी टीसीएसचा ३१.५%, इन्फोसिसचा २९.३% आणि एचसीएलचा २० टक्के महसूल या क्षेत्रातून येतो. तसेच टेक महिंद्राच्या महसुलात BFSI चा वाटा १६% आहे.**

# समृद्धीचा १०० दिवसांचा रिपोर्ट, महामार्गावर ९०० अपघात अन् ३१ बळी...

## 15 टक्के अपघात टायर पंक्चरमुळे झाले तर 12 टक्के अपघात हे टायर फुटल्यामुळे झाले

। नागपूर । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**विदर्भासोबतच राज्यात समृद्धी आणण्यासाठी हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे समृद्धी महामार्ग बांधण्यात आला. मात्र हा महामार्गने समृद्धी येण्याऐवजी अपघातांचा महामार्ग बनत चालला आहे. महामार्ग खुला होऊन १०० दिवस झाले असून, त्यादरम्यान ९०० अपघातांची नोंद झाली असून, त्यात ३१ जणांचा मृत्यू झाला आहे.**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ११ डिसेंबर २०२२ रोजी नागपूर ते शिर्डी समृद्धी महामार्गाचे उद्घाटन केले होते. जो समृद्धी महामार्गचा पहिला टप्पा होता. या महामार्गाला आज १०० दिवस पूर्ण झाले आहेत. यादरम्यान महामार्गावर ९०० छोटे-मोठे अपघात झाले. धक्कादायक म्हणजे ४६ टक्के अपघात हे तांत्रिक कारणांमुळे झाल्याचे समोर आले आहे. १५ टक्के अपघात टायर पंक्चरमुळे झाले आहेत. १२ टक्के अपघात हे टायर फुटल्यामुळे झाले आहेत.

**अनेक वन्य प्राण्यांचाही मृत्यू**

या अपघातांमध्ये सर्वसामान्य नागरिकांना जीव गमवावा लागला, तर वन्य प्राणीही जखमी झाले. वाहनांच्या धडकेने बहुतांश वन्य प्राण्यांनाही जीव गमवावा लागला आहे. त्यामुळे या महामार्गावर वन्य प्राण्यांच्या हालचालीबाबत निर्णय घेण्याची गरज आहे.




**दुचाकीमुळे अपघात होण्याची शक्यता**

समृद्धी महामार्गावर दुचाकी वाहनांना परवानगी नाही. मोठ्या वाहनांचा वेग जास्त असल्याने या मार्गावर दुचाकी वाहनांना बंदी आहे. मात्र, असे असतानाही अनेक ठिकाणी दुचाकीस्वार या महामार्गावरून प्रवास करताना दिसतात. त्यामुळे अपघात होण्याची शक्यता आहे. दुचाकी अचानक समोर आल्याने वेगावर नियंत्रण ठेवणे कठीण जात असल्याच्याही तक्रारी आहेत.

### राज्य परिवहन मार्गदर्शक तत्त्वे जारी करा

**» पंतप्रधान मोदींनी समृद्धी महामार्गाचे उद्घाटन केल्यानंतर हा रस्ताही वाहतुकीसाठी खुला करण्यात आला. मात्र, वारंवार होणाऱ्या अपघातांमुळे हा महामार्ग चर्चेत आला आहे. इंधन संपल्याने वाहने रस्त्यावर उभी केल्याने किंवा इंधन संपल्याने त्यांनी वाहन बाजूला पार्क केल्याने हा अपघात झाल्याचे परिवहन विभागाच्या तपासात समोर आले आहे. यासोबतच समितीने राज्य परिवहन विभागाला याबाबत मार्गदर्शक तत्त्वे जारी करण्याचे आदेश दिले आहेत.**

# 'बॉलीवूड'ची शिल्पा झाली 'टॉलीवूड'ची 'सत्यवती'






बॉलिवुडची फिटनेस फ्रिक आणि लोकप्रिय अभिनेत्री शिल्पा शेट्टी ही कन्नड चित्रपटसृष्टीत पदार्पण करत आहे. आता दाक्षिणात्य चित्रपटसृष्टीची भलतिच हवा आहे. नुकताच साउथच्या आरआरआरला ऑस्कर मिळाला आहे.ता बरेच बॉलिवूड कलाकार हे टॉलिवूडकडे वळतांना दिसत आहे. त्यात बॉलिवुडचा बादशाह शाहरुख खान असो किंवा जान्हवी कपुर आता शिल्पा शेट्टीही टॉलिवुडमध्ये दिसणार आहे. ती कन्नड चित्रपटात दिसणार आहे. मात्र, या अभिनेत्रीचे कन्नड इंडस्ट्रीतील पदार्पण नाही. याआधीही तिने कन्नड सिनेमात काम केले आहे.अभिनेत्री शिल्पा शेट्टीने आपल्या अभिनय आणि सौंदर्याच्या जोरावर बॉलिवूडवर जादू दाखवत आहे. 90 च्या दशकातील यशस्वी शिल्पा आता तिची साऊथ सिनेमात तिची जादू पसरवणार आहे.चैत्र नवरात्री गुढीपाडव्याच्या निमित्त शिल्पा शेट्टीने तिच्या आगामी चित्रपटाची घोषणा केली आहे. शिल्पा शेट्टी लवकरच कन्नड सुपरस्टार ध्रुव सर्जाचा आगामी चित्रपट 'केडी द डेव्हिल'मध्ये दिसणार आहे.या चित्रपटातील शिल्पा शेट्टीचा फर्स्ट लूकही निर्मात्यांनी रिलीज केला आहे.

शिल्पाची भुमिका असणारा हा गँगस्टर ड्रामा सिनेमा असल्यांच बोलल जात आहे. यामध्ये शिल्पा महत्त्वाच्या भूमिकेत दिसणार आहे. ती सत्यवती च्या भुमिकेत दिसणार आहे. शिल्पा शेट्टीनेही या चित्रपटातील तिचा फर्स्ट लूक शेअर केला आहे. अभिनेत्री अतिशय दमदार लूकमध्ये दिसत आहे. तिने पांढऱ्या रंगाची पोल्का डॉट साडी नेसलेली दिसत आहे. डार्क चष्मा घातलेला आणि हातात पर्स घेतलेल्या शिल्पाचा फोटोतुनच स्वॅग पाहायला मिळत आहे. या पोस्टसोबत शिल्पा शेट्टीने कॅप्शन लिहिले आहे, 'गुढी पाडव्याच्या आणि चैत्र नवरात्रीच्या हार्दिक शुभेच्छा. नवीन सुरुवातीच्या या खास दिवशी, मला तुमच्यासोबत हे शेअर करतांना अत्यंत आनंद होत आहे की मी 'केडी द डेव्हिल' चित्रपटात सत्यवतीची भूमिका साकारताना दिसणार आहे



# 'मी पठाण सोबतच' पाकची अभिनेत्री बोलली, खासदारांचा संताप!

पाकिस्तानी अभिनेत्री माहिरानं बॉलीवूड सेलिब्रेटींची बाजू घेणं ही तिची पहिलीच वेळ नाही. यापूर्वी देखील तिनं बॉलीवूड कलाकारांवर पोस्ट करुन नेटकऱ्यांचे लक्ष वेधून घेतले होते. मायरा ही त्यांच्या देशात लोकप्रिय अभिनेत्री आहे. पण गेल्या काही दिवसांत बॉलीवूडविषयी तिची आपुलकी जरा जास्तच वाढलेली दिसते.पाकिस्तानमध्ये चालणाऱ्या रियॅलिटी शो मध्ये माहिरा खानवर काही प्रश्न विचारले जातात. तिच्या अभिनयावरुनही बरेचसे प्रश्न विचारण्यात आले असून त्याविषयी अभिनेत्रीनं नाराजी देखील व्यक्त केली होती. माझी बदनामी केली जात असल्याचे सांगितले होते. आता तर तिनं थेट बॉलीवूडचा किंग खान शाहरुख खान विषयी प्रतिक्रिया दिल्यानं ती चर्चेत आली आहे. तिचं म्हणणं आहे की, मला जसं वाटतं तसं मी बोलणार यामुळे कुणाला काय वाटतं हे माझ्या दृष्टीनं महत्वाचं नाही.



# हताचा भलताच रोमँटिक अंदाज..

अभिनेत्री हृता दुर्गुळे सध्या बरीच चर्चेत आहे. कारण 'अनन्या' नंतर आता तिचा "सर्किट" हा दमदार चित्रपट येऊ घातला आहे. या चित्रपटाची सध्या मराठीत बरीच चर्चा आहे.

अशातच या चित्रपटातलं रोमँटिक गाणं नुकतंच सोशल मीडियावर लॉँच करण्यात आलं. "काहीसा बावरतो, काहीसा सावरतो...." असे हलकेफुलके शब्द असलेलं हे गाणं सोनू निगम यांनी गायलं असून, वैभव आणि हृता यांची छान केमिस्ट्री या गाण्यात पहायला मिळते आहे.

# वरुण धवन-जान्हवी कपूरचा 'बवाल' या दिवशी थिएटरमध्ये होणार दाखल

वरुण धवन आणि जान्हवी कपूर स्टारर मोस्ट अवेटेड चित्रपट 'बवाल'ची वाट पाहत असलेल्या चाहत्यांसाठी एक आनंदाची बातमी आहे. चित्रपट निर्मात्याने त्याच्या आगामी प्रोजेक्ट 'बवाल'ची घोषणा केली आहे. निर्मात्यांनी ट्विट करून चित्रपटाच्या प्रदर्शनाच्या तारखेची माहिती दिली आहे.

'छिछोरे'सारखा यशस्वी चित्रपट दिल्यानंतर साजिद नाडियादवाला आणि नितेश तिवारीची जोडी पुन्हा एकदा 'बवाल' घेऊन येत आहे. त्याला 'छिछोरे'साठी सर्वोत्कृष्ट हिंदी फीचर फिल्मचा राष्ट्रीय पुरस्कारही मिळाला आहे, तर निर्मात्यांनी 'बवाल'च्या रिलीज तारखेबाबत ट्विटरवर पोस्ट केले आहे, "राष्ट्रीय पुरस्कार विजेते साजिद नाडियादवाला आणि नितेश तिवारी 'बवाल'सोबत परतले आहेत. ६ ऑक्टोबर २०२३ रोजी तुमच्या जवळच्या चित्रपटगृहांमध्ये त्यांची एपिक क्रिएकशन पहा! स्टारिंग वरुण धवन आणि जान्हवी कपूर."

जान्हवी कपूर आणि वरुण धवनची नवीन जोडी रोमँटिक पीरियड ॲक्शन-ड्रामा 'बवाल'मध्ये दिसणार आहे. यापूर्वी हा चित्रपट 7 एप्रिल 2023 रोजी रिलीज होणार असल्याचे सांगण्यात आले होते परंतु VFX समस्यांमुळे ही रिलीज तारीख पुढे ढकलण्यात आली होती.

हा चित्रपट वरुण धवनच्या कारकिर्दीतील आतापर्यंतचा सर्वात महागडा चित्रपट असल्याचे बोलले जात आहे. नाडियाडवाला ग्रँडसनच्या बॅनरखाली साजिद नाडियादवाला यांनी 'बवाल'ची निर्मिती केली आहे आणि अर्थस्काय पिक्चर्सची सह-निर्मिती आहे.'बवाल' ही प्रेमकथा सांगितली जात आहे. उत्तर प्रदेशातील लखनऊमध्ये एप्रिलमध्ये हा चित्रपट फ्लोरवर गेला होता. पॅरिस, बर्लिन, पोलंड, ॲमस्टरडॅम, क्राको, वॉर्सा तसेच भारतातही त्याचे चित्रीकरण झाले. आणि एका वृत्तवाहिनीच्या वृत्तानुसार, चित्रपटाचे ॲक्शन डायरेक्टर आणि स्टंटमॅन यांना जर्मनीतून नेमण्यात आले होते. चित्रपटाच्या क्रूमध्ये 700 हून अधिक लोक होते.



# जिंकता जिंकता भारत हरला!

## सामन्यासह मालिका गमावण्याची नामुष्की, फलंदाजांची पुन्हा हाराकिरी

।चेन्नई ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।


**जिंकणारा सामना कसा गमावयचा हे भारतीय संघाने या सामन्यात दाखवून दिले. विराट कोहली खेळत असताना भारत हा सामना जिंकेल असे वाटत होते. कोहलीने अर्धशतक झळकावले होते. पण कोहली बाद झाला आणि सामना फिरला. त्यामुळे भारतीय संघाला या सामन्यासह मालिकाही गमवण्याची पाळी आली आहे.**



जिंकता जिंकता सामना कसा हरायचा, याचा उत्तम नमुना भारताने यावेळी दाखवून दिला. कारण ऑस्ट्रेलियाच्या आव्हानाचा पाठलाग करताना भारताने चांगली सुरुवात केली होती. विराट कोहलीने अर्धशतक झळकावले आणि सामना भारताच्या बाजूने झुकायला सुरुवात झाली होती. पण कोहली बाद झाला आणि सामना फिरला. कोहली बाद झाल्यावर हार्दिक पंड्या आणि रवींद्र जडेजा यांनी काही काळ किल्ला लढवला खरा, पण त्यांना संघाला विजय मिळवून देता आला नाही. त्यामुळे भारताला हा सामना २१ धावांनी गमवावा लागला. या सामन्यासह भारताला मालिकाही गमवावी लागली आहे.

भारतापुढे ऑस्ट्रेलियाच्या संघाने २७० धावांचे आव्हान ठेवले होते. या आव्हानाचा पाठलाग करताना भारताला रोहित शर्मा आणि शुभमन गिल यांनी दमदार सुरुवात करून दिली होती. पण रोहित शर्मा यावेळी ३० धावांवर बाद झाला आणि भारताला पहिला धक्का बसला. रोहित बाद झाल्यावर काही वेळातच गिलही ३७ धावांवर बाद झाला. दोन्ही सलामीवीर बाद झाले असले तरी विराट कोहलीने यावेळी भारताचा डाव चांगलाच सावरला.

कोहलीने राहुलच्या मदतीने यावेळी अर्धशतकी भागीदारी रचली आणि भारताला विजयाचे स्वप्न दाखवले. पण राहुल ३२ धावांवर बाद झाला आणि ही जोडी फुटली. पण विराट मात्र खेळपट्टीवर पाय रोवून उभा होता. कोहलीने यावेळी आपले अर्धशतक झळकावले आणि भारतीय संघ विजयाच्या दिशेने कूच करत होता. पण त्याचवेळी कोहलीकडे एक मोठी तूक घडली. एक मोठा फटका मारण्याच्या नादात कोहली बाद झाला आणि भारताला मोठा धक्का बसला. कोहलीने यावेळी ७२ चेंडूंत ५४ धावांची दमदार खेळी साकारली. कोहली बाद झाला आणि त्यानंतर सूर्यकुमार यादव पुढच्याच चेंडूवर बाद झाला. सलग तिसऱ्यांदा या मालिकेत तो पहिल्याच चेंडूवर बाद झाला. त्यानंतर हार्दिक पंड्या आणि रवींद्र जडेजा यांनी काही काळ फलंदाजी केली खरी, पण या दोघांनाही भारताला विजय मिळवून देता आला नाही. त्यामुळे भारताला हा सामना गमवावा लागला आणि मालिकाही त्यांच्या हातून निसटली.



### भारताने तिसऱ्या सामन्यासह मालिकाही गमवावी लागली

» भारत आणि ऑस्ट्रेलियामध्ये तिसरा आणि शेवटचा सामना आज खेळवला जात आहे. या सामन्यात ऑस्ट्रेलियाने नाणेफेक जिंकत प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. ऑस्ट्रेलियाने पहिली फलंदाजी करताना २६९ धावांची खेळी साकारली. पहिल्या १० षटकांमध्ये ऑस्ट्रेलिया दमदार फलंदाजी केली. पण १० षटकांनंतर हार्दिकने भारताला पहिला ब्रेकथ्रू मिळवून दिला. त्यानंतर ऑस्ट्रेलियाने आपले विकेट्स गमावले. कोणत्या एका खेळाडूने मोठी धावसंख्या उभारली नसली तर त्यांनी भागीदारी करत संघासाठी धावा गोळा केल्या. भारताकडून हार्दिक, कुलदीप यादवने ३ विकेट्स मिळवल्या. तर अक्षर पटेलने २ विकेट्स मिळवले आहेत. सोबतच सिराजला २ विकेट घेण्यात यश मिळाले. ऑस्ट्रेलियाने भारताला विजयासाठी २७० धावांचे लक्ष्य दिले आहे.

# भारतातील 'या' १२ शहरांमध्ये होणार विश्वचषकाचे सामने

## » या मैदानात रंगणार फायनलचा थरार

। मुंबई ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**भारतात एकदिवसीय विश्वचषक २०२३ चा थरार रंगणार असून क्रिकेटच्या या मोठ्या टूर्नामेंटच्या तारखांबाबत आणि मैदानांविषयीची माहिती एका अहवालातून समोर आली आहे. विश्वचषकाचे सामने कोणत्या मैदानावर खेळवण्यात येणार आहेत, याविषयी सविस्तर माहिती बीसीसीआयच्या हवाल्याकडून जाहीर करण्यात आली आहे.**



एकदिवसीय विश्वचषकाचे सामने कोणत्या तारखेला खेळवले जाणार आहेत, याबाबतही खुलासा करण्यात आला आहे. ईसपीएन क्रिकइन्फोच्या अहवालानुसार यंदा भारतात होणारा एकदिवसीय सामन्यांचा विश्वचषक ५ ऑक्टोबरपासून सुरु होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. भारतातील १२ शहरांमध्ये या विश्वषकाचे सामने खेळवण्यात येणार आहेत.

विश्वचषकाच्या सामन्यांसाठी भारतातील १२ शहरांतील मैदानांची निवड करण्यात आली आहे. या १२ शहरांमध्ये बंगळुरु, चेन्नई, दिल्ली, धरमशाला,गुवाहाटी, है द्रा बा द , को ल का ता , लखनऊ,इंदौर,राजकोट आणि मुंबई यांचा समावेश आहे. या विश्वचषकात एकूण ४८ सामने खेळवण्यात येणार असून यामध्ये तीन नॉकआऊट सामन्यांचा समावेश आहे. या विश्वचषकाचा अंतिम सामना १९ नोव्हेंबरला अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियममध्ये खेळवण्यात येणार असल्याचं अहवालातून समोर आलं आहे.४६ दिवस या विश्वचषकाच्या सामन्यांचा थरार रंगणार आहे. दहा वर्षांपासून एकही आयसीसी ट्रॉफी भारताने जिंकली नाही. त्यामुळे यंदाचा विश्वचषक जिंकण्यासाठी भारताचे खेळाडू कंबर कसत आहेत. २०११ मध्ये भारताने विश्वचषकाच्या विजेत्यापदावर शिक्कामोर्तब केला होता. त्यामुळे १० वर्षांनंतर होणाऱ्या या एकदिवसीय विश्वचषकावर टीम इंडिया पुन्हा एकदा नाव कोरणार का? हे पाहणं औत्सुक्याचं ठरणार आहे.

भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात तीन एकदिवसीय सामन्यांची मालिका सुरु असून आज चेन्नईत अंतिम सामना खेळवला जात आहे. आगामी होणाऱ्या विश्वचषकाच्या पार्श्वभूमीवर भारतासाठी ऑस्ट्रेलिया विरुद्ध सुरु असणारी मालिका जिंकणे आवश्यक आहे. खेळाडूंचा आत्मविश्वास आणखी वाढण्यासाठी या मालिकेवर जेतेपदाचं शिक्कामोर्तब करणं महत्वाचं ठरणार आहे. दरम्यान, यंदाच्या विश्वचकासाठी टीम इंडियाचं नेतृत्व रोहित शर्मा करणार असून हे विश्वचषक जिंकण्यासाठी सर्व खेळाडू शर्थीचे प्रयत्न करतील, असा आशावाद व्यक्त केला जात आहे. या विश्वचकाआधी ७ जून ते ११ जून दरम्यान भारत-ऑस्ट्रेलिया यांच्यात वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपचा अंतिम सामना होणार आहे.

# महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धा सांगलीतच रंगणार!

## कुस्तीपटू आजपासून दाखल

। सांगली। महाईन्यूज ।
वृत्तसंस्था ।

**पहिली महिला महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धा सांगलीत होणार की नाही होणार, या चर्चांचा धुरळा आज खाली बसला. महापौर दिग्विजय सूर्यवंशी यांच्या हस्ते जिल्हा क्रीडा संकुलात मंडप उभारणीचा प्रारंभ झाला. दरम्यान, महाराष्ट्र केसरी कुस्तीप्रमाणेच या स्पर्धेत वजनगटांची रचना केली आहे. खुल्या गटात मात्र ६५ ते ७६ किलो दरम्यानच्या महिला मल्लांचा समावेश असेल. महिला कुस्तीपटू उद्या (ता. २२) दाखल होत आहेत.**

जिल्हा क्रीडा संकुलात या पहिल्यावहिल्या स्पर्धेसाठीची तयारी अंतिम टप्प्याकडे आहे. राज्य कुस्तीगीर परिषद व जिल्हा तालीम संघातर्फे स्पर्धा होत आहे. कार्याध्यक्ष नामदेवराव मोहिते म्हणाले, "तीनवेळा महाराष्ट्र केसरी व एकवेळ राष्ट्रीय कुस्ती स्पर्धा संयोजनाचा अनुभव आहे.

